महाराष्ट्र शासन

# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण पालघर, जिल्हा पालघर यांचे कार्यालय

पार्श्वनाथ ९ इमारत, बिडको नाका,
नवली, ता.पालघर, जिल्हा-पालघर

दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२५३१११
Email ID : collectorpalghar@gmail.com

---

**वाचले:-**

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील कलम ३४ व ५१(b)
२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र/करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
३) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
४) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१४/०३/२०२०.
५) या कार्यालयाचे आदेश क्र.जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/हॉटेलबंद/आदेश/कावि-२०८/२० दि.१४/०३/२०२०.

---

क्र.जि.आ.व्य.पालघर/कोरोना विषाणू/उपहारगृह/खाणावळ/आदेश/कावि- २३१/२० दि.१८/०३/२०२०

जिल्हाधिकारी पालघर

**आदेश**

ज्याअर्थी राज्य शासनाने करोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च, २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हयाच्या कार्यक्षेत्रातील नागरिकांचे आगमन व प्रस्थान प्रतिबंधीत करण्याबाबत आवश्यक आहे. पालघर जिल्हयामध्ये केळवा, माहिम, सातपाटी, अर्नाळा, डहाणू, बोईसर, बोर्डी, जव्हार, वाडा इत्यादि गावांमध्ये/शहरामये पर्यटकांची उपस्थिती मोठया प्रमाणावर दिसून येते. यास्तव उपोद्घातातील क्र.५ अन्वये पालघर जिल्हयातील सर्व हॉटेल बंद करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. परंतू पालघर जिल्हयामधून जाणारे राष्ट्रीय/राज्य/जिल्हा मार्ग लक्षात घेता नागरिकांसाठी /वाहनचालकांसाठी अल्पोपहार /भोजनाची व्यवस्था उपलब्ध असणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र.४ मधील शासन अधिसुचनेनुसार जिल्हाधिकारी पालघर यांना पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

त्याअर्थी मी **डॉ.कैलास बा. शिंदे, जिल्हाधिकारी पालघर तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, पालघर** मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधीलकलम ३४ व उपोद्घातातील अ.क्र.४ अन्वये शासन अधिसूचनेनुसार मला पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून निर्गमित केलेल्या अधिकाराचा वापर करुन उपोद्घातातील अ.क्र.५ अन्वये हॉटेल बंद करणेकामी पारीत करण्यात आलेले आदेश कायम ठेवून **पालघर जिल्हयाच्या कार्यक्षेत्रामध्ये येणारे उपहारगृह / खाणावळ हे पुढील निर्बंधासह चालू राहतील. जिल्हयातील सर्व उपहारगृह / खाणावळ येथे उपहारगृहाच्या / खाणावळीच्या चालकांनी पार्सल (Take away) व्यवस्था सुरु करावी. जिल्हयातील सर्व उपहारगृहाच्या / खाणावळीच्या चालकांनी त्यांच्या उपहारगृहामध्ये / खाणावळीमध्ये पाच पेक्षा अधिक ग्राहकांची / नागरीकांची गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी. जिल्हयातील सर्व उपहारगृहाच्या / खाणावळीच्या चालकांनी त्यांचे संपूर्ण क्षेत्र (टेबल, खुर्ची, स्वयंपाकासाठी वापरण्यात येणारे सर्व भांडी, फरशी इ.) हे प्रत्येक दोन तासांनी निर्जंतुक करावे. उपहारगृहाच्या / खाणावळीच्या प्रवेशव्दारामध्ये ग्राहकांचे / नागरिकांचे**

**हात धुण्यासाठी हँड वॉश सह व्यवस्था करावी. आपल्या उपहारगृहामध्ये / खाणावळीमध्ये आजारी व्यक्ती आल्याचे आढळून आल्यास तात्काळ तालुका आरोग्य विभागामार्फत जिल्हा शल्य चिकित्सक यांना अहवाल सादर करावा.**

उक्त आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१(b), भारतीय दंडसंहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ व भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७ नुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश आज दि.१८/०३/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

**सही/-xxx**
(डॉ.कैलास बा.शिंदे)
**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**

**प्रत:-**

१) मा.अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदासतेजपाल रुग्णालय आवार कॉम्प्लेक्स बिल्डींग, नवीन मंत्रालय, मुंबई-४००००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) मा.विभागीयआयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
४) आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिकायांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद पालघर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) पोलीस अधीक्षक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
७) उपविभागीय अधिकारी तथा उपविभागीय दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/जव्हार/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
८) तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी वसई/पालघर/डहाणू/तलासरी/मोखाडा/जव्हार/विक्रमगड/वाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
९) जिल्हा शल्य चिकित्सक पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१०) जिल्हा आरोग्य अधिकारी पालघर यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
११) शिक्षणाधिकारी, (प्राथमिक/माध्यमिक), जि.प. पालघर यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१२) मुख्याधिकारी, नगरपरीषद पालघर/डहाणू/जव्हार यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१३) मुख्याधिकारी, नगरपंचायत वाडा/विक्रमगड/तलासरी/मोखाडा यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१४) जिल्हा महिती अधिकारी पालघर यांना आवश्यक त्या प्रसिध्दीकरीता.
१५) पोलीस निरीक्षक (सर्व) यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
१६) पालघर जिल्हयातील सर्व रिसॉर्ट, हॉटेल, उपहारगृह यांना माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

जिल्हाधिकारी पालघर
जिल्हा पालघर

**जिल्हाधिकारी पालघर तथा**
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन**
**प्राधिकरण, पालघर**